# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## Experiential Learning Activity: Poem Writing and Reading (Marathi)

**About Activity:** Students are encouraged to write and present poems before all the students. Students wrote very inspiring poems and presented before class very enthusiastically.

**Total Participants: 14**

**Date: 12.02.2026**

**Objectives:**

- ✓ Promotion of poetic culture
- ✓ Develop presentation skills
- ✓ Provide platform to nourish hidden talents














GATEWAY OF INDIA



## कॉलेजच्या सुंदर प्रवास

कॉलेजच्या त्या पहिल्या दिवशी
अनओळखी चेहऱ्यात आम्ही भेटलो
हळूहळू गप्पा रंगू लागल्या
या सहा जणींचं एक सुंदर नात झालं.

काकाचा चहा असू
की घरून आणलेला डब्बा
कॉलेजच्या परिसरात घडलेला प्रसंग
मैत्रीने रंगवलेल्या प्रत्येक क्षण.

कधी भांडण, कधी समजुती
कधी डोळ्यात पाणी आलं
पण प्रत्येक अनुभवाने
मन अधिक मजबूत बनलं.

आज वेळ पुढे सरकत आहे
वाटा कदाचित वेगळ्या असतील
पण कॅम्पसच्या त्या आठवणी
मनात सदैव घर करून जिवंत राहतील.

कारण इथेचं सापडलं हसू
इथेचे मैत्रीचं नातं घडलं
कॉलेजच्या या सुंदर प्रवासाने
6 वेगवेगळ्या मैत्रीनी भेटल्या.

## कधी कळेल का तुला

Date: / /

कधी कळेल का तुला
माझ्या मनाची ही व्यथा
मी शब्दात नाही व्यक्त होऊ शकत
पण जेव्हा तु एकदा, डोळ्यात बघशील.
तेव्हाच तुला माझं प्रेम कळू शकेल

कधी कळेल का तुला
मी का नेहमी चुकते रस्ता
कारण तुझ्या सोबत दोन पाऊलं
जास्त चालण्यासाठी

कधी कळेल का तुला
माझं बोलणं तुला नुसतं संवाद वाटतं
माझं वागणं तुला फक्त स्वभाव वाटलं
पण या शब्दांच्या आणि कृतीच्या मागची
अर्थांग प्रेम समजेल का तुला कधी

कधी कळेल का तुला
तुझ्या चेहऱ्यावरचं हसू, माझं दिवसभरचं सुख होतं
तुझ्या डोळ्यातलं पाणी, माझं आयुष्यभरचं दुःख बनतं
स्वत साठी तर सगळेच जगतात पण माझं मन
तुझ्या हृदयाच्या तालावर का धडधडतं

शिंदे पाटील भक्ती अण्णासाहेब
बी कॉम द्वितीय वर्ष
44074
'अ'

## आयुष्य कुठे थांबतं का.

घडायचंच ते घडणारच, घडल्याशिवाय राहतं का?
घडून गेलेच आहे मग, रडून काही होतं का?
दोन दिवसांच्या दुःखासाठी, कोणी जगणं सोडतं का?
(२) सगळे दिवस सारखे राहायला.. आयुष्य कुठे थांबतं का?

(२) किती आपले किती परके हे चेहऱ्यावरून कळतं का?
सुटले कितीही हात जरी, कोणी कोणावाचून मरतं का?
(२) अंधार दिसतोय चोहीकडे, म्हणून सगळं संपतं का?
थकले असतील पाय जरी, आयुष्य कुठे थांबतं का?

विसरून जावे ज्याला ते दुःख कोणी ~~[illegible]~~ गिळतं का?
कितीही धावपळ केली तरी, पाहिजे तेच मिळतं का?
काय ~~भविष्य~~ असेल भविष्य हे आधीच कोणास सांगतं का?
गेलेला क्षण पुन्हा येण्या; आयुष्य कुठे थांबतं का?

(२) हातात आहे स्वप्न मोठे, पूर्ण करायला धैर्य हवं
भीतीच्या सावलीत राहून, थांबणं आता नकोच नव्हं
मेहनतीचा घाम गाळताना, अजूनही जागा नाही
आयुष्य कुठे थांबतं का?. आता हार मानणं योग्य नाही

खाडप नेहा शरद
B.com SY (CA)

## 'बाप': वणव्यातील जळता आधार

वणवा या आयुष्याचा, दाह काळजाला देतो
तिथे सखा-सोबती, दोन क्षण गारवा होती.
मित्राच्या खांद्यावरती, हलकं होतं आपलं मन,
बापाच्या कष्टाचं मात्र, सुटत नाही कोडेपण.

मित्राच्या अंगणी मिळते, चैत्राची एक सावली,
पण बापाच्या काळजात, अंगाराचाची एक माऊली.
तो कधी रडताना दिसत नाही, कधी हसताना दिसत नाही,
बापाची खरी माया, डोळ्यांना सहज गवसत नाही.

मित्र ऐकतो गोष्ट आपली, अश्रूंना हसणं देतो,
पण बाप स्वतः जळून, आपल्याला जगणं देतो.
जो शिस्तीचा एक पहारा, कडक शब्दांचा मार,
पण त्या कठोरपणामागेच संस्कारांचा आधार.

मैत्री म्हणजे झुळूक वाऱ्याची, क्षणात शांत करते,
पण बाप म्हणजे ढाल पोलादी, जी संकटांना नडते.
मित्राकडे हक्क असतो, मनमोकळं करण्याचा,
बापाकडे भार असतो, भविष्य घडवण्याचा.

म्हणूनच वाटतो मित्र गारवा, या धगधगत्या वणव्यात
पण बाप असतो ती भिंत, जी उभी राहते वादळात.
मिळाला जर कधी वेळ, तर बापाच्या डोळ्यात पाहा
त्या शांत जळणाऱ्या दिव्यातच, आपल्या आयुष्याचा
प्रकाश पाहा.

— निकीता उध्दव बिराजदार
(B.com SY)

# ओळख स्वतःची

घराबाहेर पडताना तो, उंबरठा जड वाटला,
करिअरच्या या शर्यतीत, प्रत्येक क्षण साचला,
आईच्या डोळ्यांतील आशा, अन् बाबांचा तो धीर,
कसं सांगू त्यांना .... आतून मी किती आहे अधीर ?

एकांतात कधीतरी मग, डोळे थोडे ओलावतात,
यश कधी मिळेल ?, हेच प्रश्न छळत राहतात.
'सगळं नीट होईल' म्हणताना, आवाज थोडा कापतो,
माणूस म्हणून जगताना, प्रत्येक रुपया जपतो.

लोकांसाठी फक्त 'नोकरी', माझ्यासाठी ती स्वप्नपूर्ती आहे,
रात्रीच्या त्या जागराला, संघर्षाचीच जोड मोठी आहे,
कुणी विश्वास ठेवो न ठेवो, मला मात्र लढायचंय,
शून्यातून विश्व माझं, मला स्वतःला घडवायचंय.

हसेल जग आज कदाचित, माझ्या या धडपडीवर,
पण एक दिवस नाव असेल, यशाच्या त्या पायरीवर
स्वतःचा विश्वास हीच, माझी खरी शिदोरी,
कष्टानेच ~~उघड~~ उघडेल बघ, माझ्या भविष्याची तिजोरी.

नाव :- चिभुरे महादेवी श्रीरंग
वर्ग :- B.com S.Y (B)
ह.क्र :- 44208

## गुरू

गुरू म्हणजे जसा कुंभार
जे मातीला देतात आकार
ज्यांच्या अनमोल ज्ञानाने
करतात विद्यार्थ्यांचे आयुष्य साकार

गुरू म्हणजे जे दाखवतात
खरा मार्ग यशाचा
त्यांच्या प्रत्येक सल्ल्यातुन
अर्थ कळतो या जीवनाचा

गुरू म्हणजे ते असतात
जे सगळ देऊन शुन्य होतात
पण त्यांच्यापाशी असलेले ज्ञान
त्यांना इतरांपेक्षा वेगळ बनवतात

गुरू म्हणजे शब्दापेक्षा कृति
शब्दावर विश्वास ठेवणारी नाती
अपेक्षांना धीर देणारा आधार
यशासाठि नम्रतेचे त्यांचे संस्कार

नाव : पाटील मानसी विलास
वर्ग : B.Com SY (B)

## शिक्षणाचा बाजार

Date : / /

शिक्षणाच्या या युगामध्ये
तंत्रज्ञानाचा प्रभाव झाला
हाताला नाही काम काही
फक्त शिक्षणाचा बाजार झाला

प्रयोगावर प्रयोग झाले
ऑनलाईन शिक्षणाचा प्रसार झाला
वर्गात नाहीत विद्यार्थी
नुसता शिक्षणाचा व्यापार झाला

तंत्रज्ञानाची प्रगती झाली
ए. आय हे साधन आल
बुद्धीला चालनाच नाही
ज्ञानाच हरण झाल

शिक्षण महागल इंग्रजीचा प्रभाव झाला
म्हणून तर क्लासेस ची कमी नाही
शिक्षणाचा बाजार झाला
पण नोकरीची हमी नाही

मोबाईलची फॅशन आली
मुल शाळेपासुन दूर गेली
मंदीराला तर आली चकाकी
पण शाळेची मात्र दूरदशा झाली

व्यसनांच प्रमाण वाढल
शासनाचा महसुल वाढला
तरुण पिढी खराब झाली
देशाचा कणा मोडला

- रितेश सतिश
वर्ग बी कॉम

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

**Students' Attendance Sheet : 2025-26**

काव्यवाचन स्पर्धा

**Date :** 12/2/2026 **Time:** 12.30 - 1.30

| Sr.No. | Name of Student | Class | M/F | Sign. |
|---|---|---|---|---|
| 1. | Sanika Manoj Panchakihari | B.com S.Y | F | Sanika |
| 2. | Patil Mansi vilas | B.com sy (B) | F | Mansi |
| 3. | Srushti Satish Sathe | B.com SY (A) | F | Srushti |
| 4. | khadap Neha sharad | B.com SY(A) | F | Neha |
| 5. | shinde patil Bhakti | B.com SY(A) | F | Shinde |
| 6. | Kadam Samruddhi Laxman | B.com SY(A) | F | Kadam |
| 7. | Bhosale Rajnandini Laxman | B.comSY(A) | F | Rajnandini |
| 8. | Chigure Mahadevi shrirang | B.com S.Y(B) | F | Mahadevi |
| 9. | Birajdar Nikita uddhav | B.com sy(B) | F | Nikita |
| 10. | Bansode Ankita Suresh | B.com SY(A) | F | Ankita |
| 11. | Bhosale Santosh Mahadev | B.com SY A | M | Santosh |
| 12 | Gonewad Ritesh satish | B.com SY A | M | Gonewad |
| 13 | Chikurte Nitesh Shashikant | B.com S.y(B) | M | [illegible] |
| 14) | karve Narhari Ramdas | B.com S.y(A) | M | [illegible] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Dr. G.R. Lahane

Principal
PRINCIPAL
Dayanand College of Commerce,
LATUR.